# कार्यावली

## सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवन येथे सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली

एक : अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

दोन : प्रश्नोत्तरे.

तीन : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

चार : सन २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

पाच : सन २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

सहा : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

सात : शासकीय विधेयके

आठ : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

नऊ : शोक प्रस्ताव.

दहा : **अशासकीय विधेयके :-**

विचारार्थ

१ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

२ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र जमीन-महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक-१) (सुधारणा) विधेयक, २०२५

३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसाभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५

४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२५

५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५

६ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

७ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५

८ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५

९ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा क्रमांक १८ - महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) (सुधारणा) विधेयक, २०२५

१० श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

११ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

१२ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

१३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र धुम्रपानास व थुंकण्यास मनाई करण्याबाबत विधेयक, २०२५

१४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२५

१५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) विधेयक, २०२५

१६ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०२५

१७ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ -

"महाराष्ट्र आवाज प्रदूषण प्रतिबंधक विधेयक, २०२५

१८ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२५

१९ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

२० श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

२१ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

२२ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - मुंबई न्यायालय फी (सुधारणा) विधेयक, २०२५

२३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१- महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०२५

२४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२- महाराष्ट्र कामगार स्त्रिया व महिला शेतमजूर (प्रसूती सहाय) विधेयक, २०२५

२५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटुंब नियोजनाला चालना देण्याबाबत विधेयक, २०२५

२६ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन (सुधारणा) विधेयक, २०२५

२७ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र राज्यात रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि राज्य शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे विधेयक, २०२५

२८ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५

२९ श्री.रोहित पवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ – महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) (सुधारणा) विधेयक, २०२५

३० श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५

३१ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५

३२ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ – महाराष्ट्र यंत्रमाग कामगार (नोकरीचे विनियमन व कल्याण) सुधारणा विधेयक, २०२५

३३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ – महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

३४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

३५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ – महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२५

३६ श्री.रईस शेख, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ – महाराष्ट्र धर्मगुरु, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्तवांचा अपमान (प्रतिबंध आणि शिक्षा) विधेयक, २०२५

३७ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ – महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, २०२५

३८ श्री.अजय चौधरी, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२५

३९ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० – महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक,

२०२५

४० श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ – मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२५

४१ श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ – मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारण) विधेयक, २०२५

४२ श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५

४३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६७ – महाराष्ट्र गृहनिमार्ण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०२५

४४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८ – महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

४५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६९ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२५

४६ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० – हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

४७ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७१ – महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२५

४८ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८२ – महाराष्ट्र भाडे नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

४९ श्री.अबु आजमी, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभ विधेयक क्रमांक ८३ – महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरू व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास विधेयक, २०२५

५० ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८४ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

५१ ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८५ –महाराष्ट्र

मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, २०२५

५२ ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८६ –महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२५

५३ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८७ – महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, २०२५

५४ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ – किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

५५ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१ - महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५

५६ श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०७ - महाराष्ट्र अधिवक्ता संरक्षण विधेयक, २०२५

५७ श्री.शंकर जगताप, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र नगर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (सुधारणा) विधेयक, २०२६

५८ श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र समान नागरी संहिता विधेयक, २०२६

५९ श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

अकरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६) :-

**डॉ. जितेंद्र आव्हाड वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १, ३, ४, ६ व ७**

(१) “राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा,भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परिक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता,हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३) ”राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे

झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) "राज्यात विशेषतः ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, नवी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, सांगली, कोल्हापूर आणि तत्सम इतर महानगरपालिकां क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेले नागरीकरण, झपाट्याने वाढत असलेली लोकसंख्या, नव्याने निर्माण होत असलेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली असणे, महानगरांमधील कचरा टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया केली जात नसल्याने कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असणे, दुर्गंधी पसरत असल्याने तेथील नागरीकांकडून आपल्या भागामध्ये कचरा टाकण्यास विरोध केला जात असून आंदोलने केली जात असणे, नगरवासीयांमध्ये संघर्ष होत असल्याने ह्या बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर 'स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ' स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) "राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७) "महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. चेतन तुपे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११, १२ व १४**

(११) "राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र " कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ" स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२) "राज्यभरातील वाढती लोकसंख्या वाढते नागरिकीकरण आणि दुचाकी/चारचाकी वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, यामुळे वाहतुकीच्या समस्येने धारण

केलेलं गंभीर स्वरूप, वाहनांच्या अपघातांचे वाढते प्रमाण, नियमितपणे होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीतील वाढत्या प्रमाणात होणारे प्रदूषण, वाहतुकीच्या क्षेत्रात आणि साधनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यामुळे मोनोरोल, मेट्रो रेल, रस्त्यांचे अंडरपास, बायपास, उड्डाणपूल इ. नवनवीन संज्ञा अस्तित्वात आल्याने वाहतुकीच्या समस्येला प्राप्त झालेले बहुआयामी स्वरूप, नित्याच्या वाहतूक कोंडीमुळे शहरी आणि ग्रामीण सर्वच भागामध्ये नागरिकांची होत असलेली गैरसोय, काही शहरांचे कार्यरत असलेले किंवा होऊ घातलेले कॉन्फ्रिहेन्सिव्ह मोबॅलिटी प्लॅन, ह्या प्लान्स चा परस्परांशी सुसंगत ताळमेळ नसल्याने काही ठिकाणी काही योजना नव्याने तयार करावे लागणे, इ. बाबींचा विचार करता वाहतूक प्रश्नांचा सर्वकष अभ्यास करून राज्यभरासाठी वाहतुकीचा अद्यावत कॉन्फ्रिहेन्सिव्ह मोबॅलिटी प्लॅन तयार करून त्याची आखणी-नियोजन-कार्यन्वयन-नियंत्रण यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून तातडीने कार्यन्वित करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४) "राज्यातील वेगवेगळया प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे दीर्घ काळापासून प्रलंबित असलेले काम, अनेक प्रकल्पांतील बाधितांच्या पुनर्वसनाचे शंभर टक्के काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विविध  निर्माणाधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, याविषयात वेळोवेळी उभारली जाणारी आंदोलने, परिणामी भूसंपादनाची कामे रखडून प्रकल्प उभारणीस विलंब होत असल्याने प्रकल्पाच्या खर्चात होणारी वाढ  इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अस्लम शेख वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६, १७, १८ व १९**

(१६) "राज्यातील प्रत्येक जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी माहविद्यलाये सुरु करावीत,  अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७) "राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे. एच. अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास

करीत आहे.”

(१९) “ मुंबई शहरातील वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी, वाहनांची वाढती संख्या, अरुंद रस्ते, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या, शासनाने बांधलेले उड्डाणपूल व वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतुकीची समस्या अत्यंत गंभीर बनत चालली असून यावर तातडीने मार्ग काढण्याबाबत व मुंबईतील वाहतूक सुयोग्य करण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. रामदास मसराम वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २२ व २३**

(२२) ” शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिवार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२३) “राज्यातील प्रत्येक जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी माहविद्यलाये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्रीमती ज्योती गायकवाड वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २६, २७ व ३०**

(२६) “राज्यातील प्रत्येक जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी माहविद्यलाये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(२७) ” राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(३०) ”राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक

लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२, ३३ व ३४**

(३१) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठया प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३२) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, शहरांमध्ये वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासात होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३३) " राज्यातील उद्योग जगतात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्राना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणामध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३४) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trama Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trama Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी

शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अमिन पटेल वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ३६, ३७, ३८, ३९ व ४०**

(३६) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३७) "राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या नियमांमध्ये तफावत असून राज्य शासनाच्या नियमानुसार ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या जेष्ठ नागरीकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या ज्येष्ठांसाठीच्या सोयी सुविधा मिळण्यापासून राज्यातील ६० वर्षेवरील ज्येष्ठ नागरीकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही ज्येष्ठ नागरीकांची वयोमर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३८) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडूं तयार करण्यासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३९) "राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा प्रतिकूल परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४०) "राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अमित झनक वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४१, ४२ व ४४**

(४१) "राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि

मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(४२) ''राज्यातील विशेषत: मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरीता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाडया, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(४४) ''राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास येणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे हितासाठी धोरण ठरवून जनजागृती व वृध्दांसाठी हेल्पलाईन (मदत केंद्र) व संकेतस्थळ सुरु करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. विकास ठाकरे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४७ व ४८**

(४७) ''शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(४८) ''राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trama Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trama Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**डॉ. नितिन राऊत वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ४९ व ५०**

(४९) "राज्यात पहिलीच्या वर्गासाठी वयाची ६ वर्षे पूर्ण असणे आवश्यक असले तरी ६ वर्षाचे अगोदर लहान बालकांना खासगी प्री-स्कूल, नर्सरी, ज्युनीअर के.जी, सिनिअर के.जी, डे केअर सेंटर मध्ये दाखल केले जात असून यासाठी असणाऱ्या सेंटरवर शासनाचे कोणतेही

नियंत्रण नसल्याने काही ठिकाणी बेजबाबदारपणे बालकांना वागणूक दिली जात असल्याचे प्रकार उघडकीस येणे, परिणामी भविष्यात विपरीत घटना होऊ नये व बालकांना योग्य वागणूक मिळावी यासाठी राज्य शासनाने राज्यातील सर्व खाजगी प्री-स्कूल, नर्सरी, ज्युनिअर के.जी सिनिअर के.जी व डे केअर सेंटरवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना तात्काळ करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५०) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहे. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trama Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trama Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. विश्वजित कदम वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५३, ५४ व ५६**

(५३) "राज्यातील पुणे, सांगली, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि तत्सम इतर महानगर पालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५४) "पुणे महापालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत

आहे.”

(५६) ”शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. प्रशांत ठाकूर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ५७, ५९ व ६०**

(५७) ”राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधीअभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने ह्या सर्व नळ पाणीपुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपावाव्यात, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे.”

(५९) “ राज्यात निरनिराळया विभागात येणाऱ्या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रकल्प सुरु होण्याआधी प्रकल्पग्रस्तांचे योग्यप्रकारे पुनर्वसन करण्याबाबतचा आराखडा राज्य शासनाने तयार करुन केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

(६०) ”राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे हि महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत आहे. जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत आहे. तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही शासनाने जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**श्री. अमित विलासराव देशमुख वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६१, ६२ व ६३**

(६१) ”सद्यस्थितीत महाराष्ट्रातील किशोरवयीन आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असून, तो अनेकदा अनियंत्रित स्वरूपाचा आहे. यामुळे या बालकांच्या शैक्षणिक प्रगतीवर, मानसिक आरोग्यावर आणि शारीरिक विकासावर अत्यंत गंभीर आणि नकारात्मक परिणाम होत आहेत, ज्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या जडणघडणीच्या महत्त्वाच्या टप्प्यात अडथळे निर्माण होत आहेत. शिवाय, १६ वर्षांपर्यंतचे हे कोवळे वय सायबर बुलिंग, लैंगिक फसवणूक आणि खोट्या माहितीला बळी पडण्याची सर्वाधिक शक्यता असल्याने, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ऑस्ट्रेलियासह अनेक जागतिक स्तरावर सुरू असलेल्या १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदीची चर्चा आणि वाढत्या धोक्यांची तीव्रता लक्षात घेता, बालकांच्या सुरक्षित भविष्यासाठी आणि या समस्येचे गांभीर्य ओळखून, शासनाने बालविकास तज्ज्ञ, पालक, शिक्षणतज्ज्ञ, सायबर सुरक्षा विशेषज्ञ आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवर यांच्याशी तातडीने

चर्चा करून, खालील बाबींचा समावेश असलेला एक 'बाल सुरक्षा आणि डिजिटल साक्षरता कृती आराखडा' (Child Safety and Digital Literacy Action Plan) एक मासिक (Month-wise) कालमर्यादा निश्चित करून, तात्काळ तयार करावा आणि त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६२) "राज्यात अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छीमार बांधवांच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून त्यावर प्रभावीरीत्या आळा घालण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६३) "राज्यात विशेषत: मराठवाडयात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ मराठवाडयात शाश्वत सिंचन अभियान सुरु करुन मराठवाडयातील सिंचनाचा जल आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाडयासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राहूल कुल वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६४, ६५ व ६७**

(६४) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे दीर्घ काळापासून प्रलंबित असलेले काम, अनेक प्रकल्पांतील बाधितांच्या पुनर्वसनाचे शंभर टक्के काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विविध निर्माणाधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी, याविषयात वेळोवेळी उभारली जाणारी आंदोलने, परिणामी भूसंपादनाची कामे रखडून प्रकल्प उभारणीस विलंब होत असल्याने प्रकल्पाच्या खर्चात होणारी वाढ इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६५) "राज्यात मुख्यतः शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थाचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरु करून अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६७) "दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक

उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अनिल मांगुळकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ६९, ७१ व ७२**

(६९) " राज्यातील उद्योग जगतात मोठया प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्राना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणामध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७१) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७२) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.

**श्री. साजिद पठाण वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ७६, ७७ व ७८**

(७६) ''राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(७७) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(७८) "राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठयाप्रमाणात वाढत

असणे, या शहरांच्या विविध भागात दरवर्षी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपूरी व कालबाहय झालेली असणे, शहरांतील भागात साठणा-या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्यांच्या ढीगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे-येणे मुश्किल होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना आखण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरीकांच्या आरोग्यांशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासन स्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधासभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय मेश्राम वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८०, ८१ व ८२**

(८०) "राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, शहरांमध्ये वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासात होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करित आहे."

(८१) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विदयुत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विदयुत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विदयुत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसा न टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८२) ''राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. शिरीषकुमार नाईक वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ८५, ८६ व ८७**

(८५) "राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये

असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८६) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(८७) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ९६, ९७, ९८ व ९९**

(९६) ''मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राहय धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे. सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यकती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(९७) "महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९८) "राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(९९) "मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही, केंद्राकडून पुरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरिता, आवश्यक निधीची तरतुद करुन व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता, 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे, अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**ॲड. पराग अळवणी वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १००, १०१ व १०२**

(१००) "मुंबई शहर व उपनगरात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत होत असलेली वाढ तसेच सर्वत्र विकासकामे प्रगतीपथावर असल्याने वाहतुकीची होणारी कोंडी, विविध कारणांमुळे होणारे अपघात, कर्कश होर्न वाजवून होत असलेले ध्वनी प्रदूषण, रिक्षा, टॅक्सी, ओला, उबर यांसारख्या प्रवासी वाहतुकीच्या साधनांचा अधिक प्रमाणात उपयोग होत असल्यामुळे प्रवासी वाहनांची वाढती गर्दी व अनधिकृतरित्या वाढत असलेल्या पार्किंग आदी वाहतुकीच्या समस्यांबाबत मुंबई शहर व उपनगरासाठी ठोस उपाययोजना करून त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०१) ''मुंबईसह राज्यात रेडी रेकनरच्या दरात दरवर्षी वाढ होत असल्याने, सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होत असणे, विभागीय सर्वोच्च विक्री दर रेडिरेकनरमध्ये ग्राहय धरण्यात येत असल्याने, सदनिकांच्या किंमती, मुळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढणे यामुळे सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे. सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी रेडी रेकनरचे वाढते दर स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी याबाबत राज्य शासनाने आवश्यकती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१०२) "मुंबई शहर व उपनगरातील विविध प्रकल्पांमध्ये बाधित बहुतांश प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन रखडले असणे, पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही पूर्ण झालेली असताना वारंवार निर्माण होणाऱ्या कायदेशीर अडचणी व प्रक्रिया, यामुळे प्रकल्पग्रस्तांसमोरील वाढलेल्या समस्या व होणारे हाल विचारात घेऊन प्रकल्पग्रस्तांचे तात्काळ पुनर्वसन होण्याकरिता शासनाने ठोस पावले उचलावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०५ व १०६**

(१०५) "कोकणातील आंबा, काजू, फणस, जांभूळ, करवंद, कोकम, आवळा, चिंच, नारळ, बोर आदी फळांचे मोठया प्रमाणात उत्पादन होऊनही एकूण उत्पादनापैकी केवळ दीड टक्का फळांवर प्रक्रिया होणे, नाशवंत असल्यामुळे उर्वरित उत्पादन वाया जात असणे, कोकणात दिवसागणिक वाढणारे बेरोजगारीचे प्रमाण, केवळ निसर्गावर अवलंबून भात पीक घेऊन कुटुंबाची गुजराण करणारा शेतकरी आणि छोटे छोटे उद्योग व्यवसाय करण्यास उत्सुक असणारे महिला बचत गट यांना उत्पन्नाचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे यासाठी फळ प्रक्रिया उद्योगांचा टक्का वाढविण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१०६) "कोकणातील समुद्र, खाडीमध्ये मासेमारी करणारा मच्छीमार बांधव हा गेल्या काही वर्षांपासून समुद्रात होणारी सततची वादळे, चक्रीवादळे, कारोनाचे संकट, मासेमारी बंदी अशा वेगवेगळया संकटामध्ये सापडलेला आहे. त्यात राज्याच्या हद्दीत मोठमोठे ट्रोलरद्वारे मच्छिमारी करण्याचे वाढलेले प्रमाण, या परराज्यातील मच्छिमारांकडून स्थानिक मच्छिमारांवर सातत्याने होणारे हल्ले, त्याचबरोबर पारंपारिक व पर्ससिनेट मच्छिमार यांच्यात वारंवार निर्माण होणारे संघर्ष, एलइडी द्वारे मासेमारीचे वाढलेले प्रमाण परिणामी मत्स्योत्पादनात झालेली कमालीची घट, गाळाने भरलेली बंदरे, त्यामुळे व्यवसायावर

झालेला परिणाम, मत्स्यदुष्काळ असो वा अन्य कोणतीही संकटे आली तरी शेतकऱ्यांप्रमाणे मच्छिमार समाजाला कर्जमाफी किंवा अन्य मदत न मिळणे, अशा अनेक विवंचनेत आणि आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आलेल्या मच्छीमार समाजाला विविध मार्गाने आधार देण्याची गरज आहे. शासनाने यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्रीमती मनिषा चौधरी वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १०८ व ११०**

(१०८) "मुंबईतील एसआरए योजना, नवीन निर्माणाधीन मॉल्स तसेच व्यावसायिक व्यापारी संकुलांमध्ये वाढीव एफएसआय देण्यात येतो.त्या अनुषंगाने महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी, अशा ठिकाणी महिला बचत गटांसाठी विक्रीसाठी विशेषत: कायमस्वरूपी गाळे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मुंबईतील एसआरए योजना, नव्याने उभारल्या जाणाऱ्या मॉल्स व व्यावसायिक संकुलांमध्ये वाढीव एफएसआयच्या अटीत महिला बचत गटांसाठी त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कायमस्वरूपी गाळे राखीव ठेवावेत व त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची गरज, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११०) "राज्यात विशेषत: ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यासह किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारेपाणी शेत जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तिव्रता व परिणामी लोकांचे व लोकांच्या मालमत्तेचे होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्यांची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. शंकर जगताप वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११३, ११४ व ११५**

(११३) "राज्यभरातील वाढती लोकसंख्या वाढते नागरिकीकरण आणि दुचाकी/चारचाकी वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, यामुळे वाहतुकीच्या समस्येने धारण केलेलं गंभीर स्वरूप, वाहनांच्या अपघातांचे वाढते प्रमाण, नियमितपणे होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीतील वाढत्या प्रमाणात होणारे प्रदूषण, वाहतुकीच्या क्षेत्रात आणि साधनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यामुळे मोनोरोल, मेट्रो रेल, रस्त्यांचे अंडरपास, बायपास, उड्डाणपूल इ. नवनवीन संज्ञा अस्तित्वात आल्याने वाहतुकीच्या समस्येला प्राप्त झालेले बहुआयामी स्वरूप, नित्याच्या वाहतूक कोंडीमुळे शहरी आणि ग्रामीण सर्वच भागामध्ये नागरिकांची होत असलेली गैरसोय, काही शहरांचे कार्यरत असलेले किंवा होऊ घातलेले कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबॅलिटी प्लॅन, ह्या प्लान्स चा परस्परांशी सुसंगत ताळमेळ नसल्याने काही ठिकाणी काही योजना नव्याने तयार करावे लागणे, इ. बाबींचा विचार करता वाहतूक प्रश्नांचा सर्वकष अभ्यास करून राज्यभरासाठी वाहतुकीचा अद्यावत कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबॅलिटी प्लॅन तयार करून त्याची आखणी-नियोजन-कार्यन्वयन –

नियंत्रण यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून तातडीने कार्यन्वित करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११४) "राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत असून राज्य शासनाच्या नियमानुसार जेष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या जेष्ठ नागरीकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयी सुविधा ६० वर्षेवरील जेष्ठ नागरीकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही जेष्ठ नागरीकांची वर्यामर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११५) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय केळकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक ११६, ११७, ११८, ११९ व १२०**

(११६) "मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही, केंद्राकडून पुरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरिता, आवश्यक निधीची तरतुद करुन व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता, 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे, अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११७) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती जास्त असल्यामुळे ही महागडी औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य रुग्णांना परवडणारे नसल्यामुळे अशा आवश्यक असलेल्या औषधा अभावी अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागत असणे, यासाठी राज्यात जेनेरिक औषधाना प्रोस्ताहन देण्याची आवश्यकता तसेच या जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असून या औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने जेनेरिक औषधांची दुकाने संपूर्ण राज्यात सुरु करून ती सर्वसामान्य रुग्णांना स्वस्त दारात उपलब्ध करून देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११८) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(११९) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे,

उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२०) "राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत असून राज्य शासनाच्या नियमानुसार जेष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या जेष्ठ नागरीकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयी सुविधा ६० वर्षेवरील जेष्ठ नागरीकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही जेष्ठ नागरीकांची वर्यामर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. बापूसाहेब पठारे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १२७, १२८, १२९ व १३०**

(१२७) "दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ६०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२८) "राज्यभरातील वाढती लोकसंख्या वाढते नागरिकीकरण आणि दुचाकी/चारचाकी वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, यामुळे वाहतुकीच्या समस्येने धारण केलेलं गंभीर स्वरूप, वाहनांच्या अपघातांचे वाढते प्रमाण, नियमितपणे होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीतील वाढत्या प्रमाणात होणारे प्रदूषण, वाहतुकीच्या क्षेत्रात आणि साधनांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यामुळे मोनोरेल, मेट्रो रेल, रस्त्यांचे अंडरपास, बायपास, उड्डाणपूल इ. नवनवीन संज्ञा अस्तित्वात आल्याने वाहतुकीच्या समस्येला प्राप्त झालेले बहुआयामी स्वरूप, नित्याच्या वाहतूक कोंडीमुळे शहरी आणि ग्रामीण सर्वच भागामध्ये नागरिकांची होत असलेली गैरसोय, काही शहरांचे कार्यरत असलेले किंवा होऊ घातलेले कॉन्फ्रिहेन्सिव्ह मोबॉलिटी प्लॅन, ह्या प्लान्सचा परस्परांशी सुसंगत ताळमेळ नसल्याने काही ठिकाणी काही योजना नव्याने तयार करावे लागणे, इ. बाबींचा विचार करता वाहतूक प्रश्नांचा सर्वकष अभ्यास करून राज्यभरासाठी वाहतुकीचा अद्यावत कॉन्फ्रिहेन्सिव्ह मोबॉलिटी प्लॅन तयार करून त्याची आखणी-नियोजन-कार्यन्वयन-नियंत्रण यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून तातडीने कार्यन्वित करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१२९) "राज्यातील नागरीकांच्या वयोमर्यादे संदर्भात केंद्र शासन व राज्य शासन यामध्ये तफावत

असून राज्य शासनाच्या नियमानुसार जेष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ असून केंद्रात ६० वर्षे वयोमर्यादा असलेल्या जेष्ठ नागरीकांना सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे राज्य शासनाच्या सोयी सुविधा ६० वर्षेवरील जेष्ठ नागरीकांना वंचित रहावे लागते, यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातही जेष्ठ नागरीकांची वर्यामर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१३०) राज्यातील पिंपरी-चिंचवड, पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर,, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणा-या कच-याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकताना या कच-यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होत असलेला तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ. बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.

**श्री. मोहन मते वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १३६, १३७, १३८ व १३९**

(१३६) "राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, त्यामुळे अपघातग्रस्तांवर प्राथमिक उपचार करण्यासाठी राष्ट्रीय व राज्य महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करण्याची असलेली नितांत आवश्यकता, सदरहू उपचार केंद्रे सुरु झाल्यास, तेथे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग, परिचारिका व इतर तत्सम कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आल्यास सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी काही अंशी दूर होणे शक्य असणे, तसेच अपघातग्रस्तांवर गोल्डन अवर मध्ये उपचार मिळणे शक्य असणे, यास्तव राष्ट्रीय व राज्य महामार्गावर प्रत्येक ५० कि.मी. अंतरावर एक उपचार केंद्र उभारावे, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे."

(१३७) "विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला कोरडा दुष्काळ असूनही पिक विमा नुकसानभरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषांमुळे शेतकरी वंचित राहत असणे, यास शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा उत्पन्न काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

(१३८) "राज्यात विशेषत: विदर्भात सिमेंट कारखाने, औष्णिक विदयुत ऊर्जा केंद्र (थर्मल पॉवर स्टेशन), कोळसा खाणी, छोटे मोठे पॉवर प्लांट, पेपर मिल्स यांसारखे अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या उद्योगांतील दुषित सांडपाणी नदीत सोडल्यामुळे नदी काठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: विदर्भातील पैनगंगा, वर्धा व सिमावती भागातील नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य आले असून त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर

आणि मच्छीमार बांधवांच्या जीविकेच्या साधनांवर, तसेच जनावरांवर, पशु - पक्षांवर विपरीत परिणाम झालेला दिसून येणे, परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, सदरहू गंभीर बाब लक्षात घेता विदर्भासह राज्यातील जलप्रदूषणावर प्रभावीरित्या नियंत्रण आणण्याकरिता शासनाने कठोर उपाययोजना करावी, अशी शिफारस विधानसभा शासनास करीत आहे."

(१३९) ''राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. अतुल भातखळकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १४१, १४२ व १४३**

(१४१) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४२) "दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित राहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१४३) " राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान वैद्यकीय उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर 50 कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक वैद्यकीय उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

**श्री. राजेश बकाने वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १४६, १४८ व १४९**

(१४६) "विदर्भात ओस पडलेल्या औद्योगिकी वसाहत, वीज, पाणी आणि जमिनी यांची विपुलता,

असूनही विदर्भाकडे उद्योजक न येणे, त्यामुळे वाढलेली प्रचंड बेरोजगारी, विदर्भातील उद्योजकांना वीज दरामध्ये सवलत न मिळणे, प्रत्यक्षात मुंबई या आर्थिक राजधानीपासून दूर अंतरावर उद्योग सुरू करण्याकरिता उद्योजकांना सवलती देण्याची आवश्यकता विचारात घेता, विदर्भातील उद्योजकांना वीज दरामध्ये किमान १५ टक्के सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनाला करीत आहे."

(१४८) "विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्ण अवेस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून विदर्भाची सिंचन विषयक प्रगती होण्याच्या दृष्टिने मोठ्या प्रमाणावर सोई उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनाला करीत आहे."

(१४९) ''राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करुन अध्ययन करित असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत असणे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. विजय देशमुख वि.स.स. यांचा ठराव क्रमांक १५०**

(१५०) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संजय देरकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १५१, १५२ व १५५**

(१५१) "विदर्भात ओस पडलेल्या औद्योगिकी वसाहत, वीज, पाणी आणि जमिनी यांची विपुलता, असूनही विदर्भाकडे उद्योजक न येणे, त्यामुळे वाढलेली प्रचंड बेरोजगारी, विदर्भातील उद्योजकांना वीज दरामध्ये सवलत न मिळणे, प्रत्यक्षात मुंबई या आर्थिक राजधानीपासून दूर अंतरावर उद्योग सुरू करण्याकरिता उद्योजकांना सवलती देण्याची आवश्यकता विचारात घेता, विदर्भातील उद्योजकांना वीज दरामध्ये किमान १५ टक्के सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनाला करीत आहे."

(१५२) "विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्ण अवेस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून विदर्भाची सिंचन विषयक प्रगती होण्याच्या दृष्टिने मोठ्या प्रमाणावर सोई उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानसभा शासनाला करीत आहे."

(१५५) "दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या

शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. रईस शेख वि.स.स. यांचा ठराव क्रमांक १५६**

(१५६) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. मनोज जामसुतकर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १५९, १६०, १६१, १६२ व १६३**

(१५९) "राज्यात उद्योग जगतात मोठया प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद,उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देताना स्थानिक भूमीपूत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

(१६०) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानसभा शासनास करीत आहे."

(१६१) "मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किमतीत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किमती मूळ किमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे अवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१६२) ''राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१६३) ''राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवर अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी तसेच, कायद्यामध्ये कडक तरतूदी करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. योगेश सागर वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६४, १६५, १६६, १६७ व १६८**

(१६४) ''राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेल प्रमाण. खाडीच्या आजूबाजूच्या परिसरात दगडमाती टाकल्यामुळे नष्ट होत असलेली खारफुटी, बेसुमार वृक्षतोडीमुळे होणारी जमिनीची धूप, त्यामुळे पर्जन्यमानात झालेली घट, वाढते प्रदूषण, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाबी लक्षात घेता, यासाठी निश्चित स्वरूपाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१६५) ''मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत राज्यातील गरजू जनतेला परवडतील अशा दरात घरे देण्यासाठी राज्य शासनाने मिठागराची जमीन ताब्यात घेऊन तेथे परवडतील अशा घरांची निर्मित्ती करण्यासाठी राज्यशासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१६६) ''राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१६७) '' राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी

(शा.म.मु.) एचबी ५१२—५ (१०००—६-२०२६)

आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१६८) ''राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या ओद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांकडे अत्याधुनिक शस्त्रांची कमतरता, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिला, मुली व बाल लैंगिक अत्याचाराचे वाढते प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्यामुळे तपासणीत होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणारा विलंब त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, पोलिसांच्या कामाची वेळ ८ तास केल्यामुळे आणखीन पोलिसांची निर्माण झालेली गरज, पोलिसांच्या संख्येत वाढ करून त्यांना अत्याधुनिक शस्त्रे पुरविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे.''

**श्री. श्याम खोडे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १६९ व १७०**

(१६९) ''राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trama Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trama Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(१७०) ''राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या ओद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांकडे अत्याधुनिक शस्त्रांची कमतरता, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिला, मुली व बाल लैंगिक अत्याचाराचे वाढते प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्यामुळे तपासणीत होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणारा विलंब त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, पोलिसांच्या कामाची वेळ ८ तास केल्यामुळे आणखीन पोलिसांची निर्माण झालेली गरज, पोलिसांच्या संख्येत वाढ करून त्यांना अत्याधुनिक शस्त्रे पुरविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे.''

**श्री. नारायण कुचे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १७५, १७६, १७७, १७८ व १७९**

(१७५) राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, शहरांमध्ये वाढलेली

गुन्हेगारी, अपुरी पोलीस व्यवस्था, पोलिसांवर पडणारा मानसिक ताण, त्यातच महिलांवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासात होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष, त्याकरिता पोलिसांच्या संख्येत करावयाची वाढ, पोलिसांच्या मानसिक स्थितीत सुधारणा करण्याकरिता तसेच महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करित आहे."

(१७६) राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांमधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठ्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका, त्याठिकाणी होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोच, परिणामी नगरवासियांमध्ये संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इत्यादी बाबींना आळा घालण्यासाठी राज्यात स्वतंत्र कचरा प्रक्रिया विभाग आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७७) राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७८) राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७९) "राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौध्दिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अनिल पाटील वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १८१, १८२, १८३ व १८४**

(१८१) ""राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या

अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trama Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trama Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८२) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास येणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे हितासाठी धोरण ठरवून जनजागृती व वृध्दांसाठी हेल्पलाईन (मदत केंद्र) व संकेतस्थळ सुरु करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८३) " राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८४) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. अशोकराव माने (बापू) वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १८६, १८७, १८८ व १९०**

(१८६) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र)

व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८७) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१८८) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९०) "राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुका स्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. धनंजय मुंडे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १९१, १९३, १९४ व १९५**

(१९१) "राज्यात १६ वर्षांखालील मुलांमध्ये मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर चिंताजनक पद्धतीने वाढत असून, त्याचे मुलांच्या मानसिक आरोग्यावर, शिक्षणावर आणि सामाजिक वर्तनावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत आहेत; तरी या वाढत्या व्यसनाधीनतेपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने 'स्वतंत्र बाल इंटरनेट सुरक्षा व डिजिटल नियंत्रण धोरण' (Digital Safety Policy for Minors) त्वरित तयार करावे आणि त्यात स्क्रीन टाईम मर्यादा, वयआधारित निर्बंध, पालक नियंत्रण (Parental Control) व शाळा-पालक समन्वय वाढवण्याबाबतच्या कडक कायदेशीर तरतुदींचा समावेश करावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९३) "महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या सोयीसाठी मा. सर्वोच्च न्यायालयाचे एक खंडपीठ मुंबई येथे स्थापन करावे, अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९४) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास येणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे हितासाठी धोरण ठरवून जनजागृती व वृध्दांसाठी हेल्पलाईन (मदत केंद्र) व संकेतस्थळ सुरु करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९५) "राज्यातील प्रत्येक जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करुन शासकीय अभियांत्रिकी माहविद्यलाये सुरु करावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. समाधान आवताडे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक १९६, १९७, १९८, १९९ व २००**

(१९६) "राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९७) "राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९८) "राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१९९) "राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२००) "राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. संतोष दानवे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २०१, २०२, २०३, २०४ व २०५**

(२०१) ''राज्यातील जीवनावश्यक वस्तूंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानातून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा नियमित पुरवठा होण्यासाठी सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२०२) ''राज्यात देशी खेळाऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरूण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२०३) ''राज्यात नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महाग औषधे खरेदी करून उपचार करणे गोरगरीब व सामान्य जनतेला परवडणारे नसल्यामुळे औषधा अभावी अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागत असणे, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपनीच्या औषधा प्रमाणेच येत असणे, तसेच औषधांच्या किमंती वाजवी दरात असल्याने त्या गोरगरीब जनतेला मिळणे आवश्यक असल्याने राज्यातही जेनेरिक औषधे खरेदी करून जनतेला ती उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गावपातळीवर व शहरांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२०४) ''राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२०५) ''राज्यात स्थापन होणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये ८० टक्के स्थानिक तरुणांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

**श्री. किसन कथोरे वि.स.स. यांचे ठराव क्रमांक २०८, २१० व २११**

(२०८) ''राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.''

(२१०) " राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयामध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमिपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.

(२११) " राज्यात वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**श्री. राजकुमार बडोले वि.स.स. यांचा ठराव क्रमांक २१४**

(२१४) राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेले विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.

**बारा** : सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरित करण्यात येईल).

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १९ जून, २०२६

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा

****